पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय,
संत तुकारामनगर, पिंपरी – ४११०१८.

दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपाची
विविध पदे भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरिता दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात केलेली विविध पदे हंगामी/ तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता भरावयाची आहेत. त्यांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण व अटीशर्तीचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकुण मानधन | अर्ज सादर दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | **ब्लड बँक टेक्निशियन** (अनु.जाती-१,इमाव-१,खुला-१) | ३ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची BSC उत्तीर्ण व शासन मान्यता प्राप्त DMLT कोर्स उत्तीर्ण, FDA approved. | २४८९८/- | २६/०६/ २०१९ |
| २ | **ब्लड बँक कॉन्सिलर** एकाकी पदास आरक्षण लागू नाही | १ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची M.S.W. कोर्स उत्तीर्ण | २४८९८/- | २६/०६/ २०१९ |
| ३ | **एम.एस.डब्ल्यु.**(Medical Social Worker Blood Bank) (अनु.जाती-१,खुला-१) | २ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची M.S.W. कोर्स उत्तीर्ण | २४८९८/- | २६/०६/ २०१९ |
| ४ | **डाटा एन्ट्री ऑपरेटर** (अनु.जाती-१,इमाव-१-,एसईबीसी-१, खुला-२) | ५ | १२ वी पास, इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र., मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. मान्यताप्राप्त संस्थेचे संगणक प्रशिक्षण प्रमाणपत्र | २३४७५/- | २६/०६/ २०१९ |
| ५ | **डायलेसिस टेक्निशियन** (अनु.जाती-१,इमाव-१,खुला-१) | ३ | १० वी पास, डायलेसीस विभाग रूग्णालयाकडील एक वर्षाचा अनुभव.<br>१० वी पास व डायलेसिस कोर्स उत्तीर्ण | २३४७५/-<br>१७१००/- | २६/०६/ २०१९ |
| ६ | **फार्मासिस्ट** (अनु.जाती-१,इमाव-१,एसईबीसी-१, खुला-२) | ५ | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, शासन मान्य संस्थेकडील डी. फार्म/बी.फार्म ही पदवीका उत्तीर्ण, महाराष्ट्र फार्मसी कौन्सिल कडील नोंदणी व रिनिव्हल | २४८९८/- | २६/०६/ २०१९ |
| ७ | **एक्स-रे टेक्निशियन** ((अनु.जाती-१,इमाव-१,एसईबीसी-१, खुला-२) | ५ | १२ वी उत्तीर्ण, शासन मान्य संस्थेकडील एक्स-रे टेक्निशियन कोर्स पुर्ण, | २३४७५/- | २६/०६/ २०१९ |
| ८ | **जी.एन.एम.स्टाफनर्स**<br>अनुसुचित जाती - १२,<br>अनुसुचित जमाती - ६,<br>वि.जा, भ.ज - अ- ३, ब- २<br>क- ३, ड- २<br>वि.मागास प्रवर्ग- २<br>इतर मागासप्रवर्ग – १७,ईडब्लुएस-९<br>एसईबीसी-१५,खुला - २० | ९१ | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, शासन मान्य संस्थेकडील जी.एन.एम. कोर्स/BSC नर्सिंग पुर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक . | २४८९८/- | २६/०६/ २०१९ |
| ९ | **लॅब टेक्नीशियन** (अनु.जाती-१,इमाव-१,खुला-१)) | ३ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची BSC उत्तीर्ण व शासन मान्यता विद्यापीठ कडील DMLT कोर्स उत्तीर्ण | २४८९८/- | २६/०६/ २०१९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | **पुरूष कक्ष मदतनीस**<br>(अनु.जाती-१,इमाव-१,एसईबीसी-१, खुला-२) | ५ | ७ वी पास<br>रूग्णालयीन कामाचा अनुभव | २१३४२/- | २६/०६/२०१९ |
| ११ | **स्त्रीकक्ष मदतनीस**<br>(अनु.जाती-१,इमाव-१,एसईबीसी-१, खुला-२) | ५ | ७ वी पास<br>रूग्णालयीन कामाचा अनुभव | २१३४२/- | २६/०६/२०१९ |

**अटीव शर्ती:-**

१) मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२) ज्या दिवशी मनपास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

३) लेखी परिक्षेस व मुलाखतीस येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

४) उपरोक्त पदांना विहित केलेनुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार तसेच किमान वेतनानुसार मानधन अदा केले जाईल. अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निर्दशनात आलेस तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

५) सर्व उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व स्वत: च्या स्वाक्षरीने व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) सर्टिफिकेट, फोटो, इतर सादर करणे बंधनकारक आहे.

६) निवड केलेल्या उमेदवारांना म.न.पा.ने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणुक रद्द करण्यात येईल.

७) सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

८) सन २०१८ नंतर वायसीएमएच रूग्णालयास काम केलेल्या उमेदवारांनी पुनश्च अर्ज करू नये. त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही .

९) रूग्णालयातील आवश्यकतेनुसार उक्त पदसंख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार रूग्णालय व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

१०) **आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झालेस सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांची नेमणूक करणेत येईल.**

**मुख्य अटी खालील प्रमाणे राहतील-**

- उमेदवारांना रूग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.
- उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील. व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.
- उमेदवारांना वयाची अट लागु राहणार नाही.
- ६ महिनेकरीता फक्त ४ किरकोळ रजेव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची रजा घेता येणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता उपरोक्त प्रपत्र अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या दिनांकास यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील चाणक्य प्रशासकीय कार्यालया शेजारील हॉलमध्ये स.१०.०० ते ११.०० वाजता आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रतीसह समक्ष उपस्थित रहावे. तसेच आलेल्या इच्छुक उमेदवारांचे रजिस्ट्रेशन सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत केले जाईल. वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या लेखी परीक्षा /मुलाखतीबाबत समक्ष सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर दिवशी आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पद भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview आयोजित केल्या जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

जाहीरात क्र.- ३२८
रोटेशन क्र.- ब-२
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/७/कावि/३५५/२०१९
दिनांक -१८ /०६ /२०१९

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

# उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

फोटो

**प्रति,**
**मा.आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

**विषय**- यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपात मानधनावरील ---------------------------------------------------या पदासाठी अर्ज.

**संदर्भ**- वायसीएमएच/७/कावि/६०३/२०१८ दिनांक.२९/१०/२०१८ **(जाहिरात क्र. ब-३,३३८)**

**महोदय,**

संदर्भिय जाहिरातीनुसार मी श्री/श्रीम.----------------------------------------------- हंगामी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात दरमहा एकत्रित मानधनावर ---------------------------------------- या पदासाठी जाहिरातीमधील आवश्यक ती अर्हता धारण करीत असुन या पदासाठी निवड होण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

**आडनाव स्वत:चे नाव वडिल/पतिचे**

---

**१) संपुर्ण नाव**- ------------------------------------------------------------------------------------

**२) पत्रव्यवहारचा पत्ता**- --------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------

**३) जन्म दिनांक - / / मोबाईल क्र. –**

**४) लिंग - पुरुष ☐ स्त्री- ☐ ईमेल आयडी -**

**५) जात - प्रवर्ग –**

**६) महाराष्ट्र मेडीकल/इंडीयन मेडीकल कौन्सिल/नर्सेस कौन्सिल कडील नोंदणी क्र.** ----------------------------------- **दिनांक / /**

**७) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल –**

| अ.क्र. | शैक्षणिक | संस्था विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

८)  तांत्रिंक व इतर  अर्हता तपशिल - ----------------------------------------------------------

अनुभवाचा तपशिल –

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

| एकुण अनुभव - | वर्ष - | महिने- | दिवस- |
|---|---|---|---|

वरील नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असुन त्याबाबत  आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित  करतो/ करते की  वर दिलेली  माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कोणतीही कायदेशिर कारवाई केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

**अर्जदाराची सही**

**स्थळ –**   पिंपरी-१८ (**नाव-** श्री./श्रीम- **-----------------------------------)**

**दिनांक-**     **/११/२०१८.**

<u>सहपत्रे</u>**– अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या  प्रमाणित  सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**
**(ज्या क्रमाने जोडलेल्या आहेत त्याप्रमाणे लिहणे)**

१) **---------------------------------------------------**

२) **---------------------------------------------------**

३) **---------------------------------------------------**

४) **---------------------------------------------------**

५) **---------------------------------------------------**

६) **---------------------------------------------------**